EAU/ICD/2020-21/368
1st March, 2021

मसुदा
क्र.११/२०२०-२०२१.

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२०-२०२१ मधील ८ फेब्रुवारी, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची अकरावी बैठक **सोमवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता**आयोजित करण्यात आली.कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सदर सभा क्लाऊड व्हिडियो मिटींग (ZOOM APP) द्वारेघेण्यात आली. सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरु) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ४. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ५. | डॉ. कविता लघाटे | सदस्य |
| ६. | प्रा. (डॉ.) महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ७. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १४. | डॉ. बळीराम गायकवाड (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १५. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १६. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत :-**

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➢ **अनुपस्थिती :-**

प्रा. बी.एन. जगताप, श्री. दिपक मुकादम व डॉ. अजय भामरे यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

➢ श्रध्दांजली

**श्री. शशीकुमार मधुसूदन चित्रे**

भारतीय खगोल संशोधन विश्वातील जेष्ठ खगोलशास्त्रज्ञ श्री. शशीकुमार मधुसूदन चित्रे यांचे दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ८४ वर्षांचे होते.

**श्री. सुर्यकांत महाडिक**

भारतीय कामगार सेनेचे अध्यक्ष श्री. सुर्यकांत महाडिक यांचे दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ७४ वर्षांचे होते.

**श्रीमती ज्योती प्रमोद सोलापूरकर**

मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू यांच्या सासूबाई श्रीमती ज्योती प्रमोद सोलापूरकर यांचे दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्या ७९ वर्षांच्या होत्या.

**श्रीमती विजया पणशीकर**

नाटय संपदा संस्थेच्या श्रीमती विजया पणशीकर यांचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२१ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या.

वरील सर्व मान्यवरांच्या दुख:द निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास खालील सुधारणांसह मान्यता देण्यात आली.<br>१. पृष्ठ क्रमांक ३, बाब क्रमांक ३ येथील दुसरी ओळ<br>"वित्त व लेखा समितीचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त बाब क्र. ६ वगळून मान्य करण्यात आले व दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले."<br>**च्या ऐवजी असे वाचावे**<br>"वित्त व लेखा समितीचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या व दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले."<br>२. पृष्ठ क्रमांक ६, बाब क्रमांक १४ येथील वाक्य<br>सुमन एज्युकेशन सोसायटीचे एल.एन.कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड सायन्स (महिला) महाविद्यालयाने "सुमन एज्युकेशन सोसायटीचे एल.एन.कॉलेज ऑफ कॉमर्स, प्लॉट नं. ८९, | |

| | | |
|---|---|---|
| | जनरल खारीप्पा ब्रिज, राजेंद्र नगर, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६" ऐवजी "सुमन एज्युकेशन सोसायटीचे वीना कॉलेज ऑफ आर्टस,कॉमर्स ॲन्ड सायन्स, श्री क्रिष्णा शिक्षण प्रसारक मंडळ, ७९, श्री क्रिष्णा नगर, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६" नावात बदल करण्यासाठी व स्थलांतर करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.<br>**च्या ऐवजी असे वाचावे**<br>"असा ठराव करण्यात आला की, सुमन एज्युकेशन सोसायटीचा नावात बदल करण्यासाठी व स्थलांतर करण्यासाठी सादर केलेला प्रस्ताव शासन पत्र क्र. स्थलांतर-२०२०/(१३४/१९)/मशि-४ दिनांक १० सप्टेंबर, २०२० नुसार पुन:श्च व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आला असता सदरबाबत समितीने दिलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ११८ (१), (२), (३) मधील उपकलम a, b, c नुसार मान्य करण्यात येऊन शासनास पाठविण्याची शिफारस करण्यात आली." | |
| बाब क्र.२ | Presentation regarding Appointment of IIFCL Projects Limited (IPL) as the Project Advisor to University of Mumbai for various projects as per the letter from Hon'ble Chancellor. | Campus Developmet Unit |
| ठराव | मा. कुलगुरुंनी IIFCL Projects Ltd. या मा. कुलपती यांच्याकडून प्रस्तावित झालेल्या कंपनीचे सादरीकरण केले व त्यांस विद्यापीठाच्या विविध विकासकामांसाठी 'प्रकल्प सल्लागार' म्हणून नेमणेबाबतचा प्रस्ताव सभागृहाच्या माहितीस्तव सादर करीत असल्याचे सांगितले. सदर चर्चेत श्री. प्रदीप सावंत, श्री. राजन कोळंबेकर आणि डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी आपली नाराजी व्यक्त केली. आपले मत मा. कुलपती यांना कळविण्यात येईल असे मा.कुलगुरूंनी यांनी सांगितले. | |
| बाब क्र.३ | Approval of minutes of Building and Works Committee dated 3rd February 2021 and to place item before Management Council. | Campus Developmet Unit |
| ठराव | दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या इमारत आणि बांधकाम समितीचे इतिवृत्त मान्य करण्यात आले. | |
| | **अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेली बाब** | |
| बाब क्र.४ | Mumbai School of Economics and Public Policy is an Autonomous Department of the University. As per the Statutes No. 593 to 642 applicable to University Departments, the tenure of the Management Board is of 2 years. The tenure of the current Board will be ending on October, 31st 2020. | Economics Department |

| | | |
|---|---|---|
| | Dr. Vijay Kelkar (Chariman): He is Padma Vibhushan awardee<br>Dr. Rajas Parchure (Ex-Director, NIPFP and Ex-member PMs Economic Advisory Council )<br>Dr. Ajit Ranade (Chief Economist, Aditya Birla Group)<br>Dr. Reuben Abraham (CEO, IDFC Institute)<br>Nomination of three members to the Board of Management of Mumbai School of Economics and Public Policy (Autonomous) by the Management Council As per statute S611 (a) they should represent Education, Industry and Business with one of the being named as Chairman. | |
| ठराव | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या परीनियम कलम क्र. ५९३ व ६४२ नुसार विद्यापीठ विभागांना लागू असलेल्या कलमानुसार विद्यापीठ विभागांच्या व्यवस्थापन मंडळाचा कार्यकाळ २ वर्षांचा आहे.<br><br>मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था (स्वायत्त) यांच्या व्यवस्थापन मंडळाचा कार्यकाळ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० रोजी संपुष्टात आला आहे. त्यानुसार मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था (स्वायत्त) यांच्या नविन व्यवस्थापन मंडळावरील तीन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा.कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

उपकुलसचिव

कुलसचिव (प्र.)

प्र-कुलगुरू

इतिवृत्त मंजूर

कुलगुरू

Note-1

# मुंबई विद्यापीठ

कार्यकारी प्राधिकरणे विभाग.
क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२०-२१/३६९
२६ फेब्रुवारी, २०२१

विषय :- व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास सुधारणांसह मान्यता देणेबाबत.

महोदय,

व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तात खालीलप्रमाणे सुधारणा सुचविण्यात आल्या.

**१. पृष्ठ क्रमांक ३, बाब क्रमांक ३ येथील दुसरी ओळ**

"वित्त व लेखा समितीचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त बाब क्र. ६ वगळून मान्य करण्यात आले व दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले."

च्या ऐवजी असे वाचावे

"वित्त व लेखा समितीचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या व दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले."

**२. पृष्ठ क्रमांक ६, बाब क्रमांक १४ येथील वाक्य**

सुमन एज्युकेशन सोसायटीचे एल.एन.कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स (महिला) महाविद्यालयाने "सुमन एज्युकेशन सोसायटीचे एल.एन.कॉलेज ऑफ कॉमर्स, प्लॉट नं. ८९, जनरल खारीप्पा ब्रिज, राजेंद्र नगर, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६" ऐवजी "सुमन एज्युकेशन सोसायटीचे वीना कॉलेज ऑफ आर्टस,कॉमर्स ॲन्ड सायन्स, श्री क्रिष्णा शिक्षण प्रसारक मंडळ, ७९, श्री क्रिष्णा नगर, बोरीवली (पू), मुंबई-४०० ०६६" नावात बदल करण्यासाठी व स्थलांतर करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

च्या ऐवजी असे वाचावे

Note-1

"असा ठराव करण्यात आला की, सुमन एज्युकेशन सोसायटीचा नावात बदल करण्यासाठी व स्थलांतर करण्यासाठी सादर केलेला प्रस्ताव शासन पत्र क्र. स्थलांतर-२०२०/(१३४/१९)/मशि-४ दिनांक १० सप्टेंबर, २०२० नुसार पुन:श्च व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आला असता सदरबाबत समितीने दिलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ११८ (१),(२),(३) मधील उपकलम a,b,c नूसार मान्य करण्यात येऊन शासनास पाठविण्याची शिफारस करण्यात आली."

व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तात बाब क्र. ३ व १४ मधील सुधारणांसह मान्यता देण्यात यावी, ही विनंती.

सविनय सादर.

उपकुलसचिव

कुलसचिव(प्र.)

प्र-कुलगुरू

कुलगुरू